| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २६२ वा | रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## सोमनाथ नष्ट करणारे इतिहासाच्या पानांमध्येच राहिले

## दुर्दैवाने, मंदिर पुनर्बांधणीला विरोध करणाऱ्या शक्ती अजूनही देशात अस्तित्वात- नरेंद्र मोदी

**सोमनाथ/राजकोट वृत्तसेवा:- गुजरातमधील सोमनाथ मंदिराबाबत पंतप्रधान मोदी म्हणाले की, १,००० वर्षांपूर्वी आक्रमकांना वाटायचे की ते जिंकले आहेत, परंतु आजही सोमनाथ मंदिरावर फडकणारा ध्वज भारताची ताकद आणि क्षमता प्रकट करतो. सोमनाथचा इतिहास विनाश आणि पराभवाचा नाही तर विकास आणि पुनर्बांधणीचा आहे.**

सद्भावना मैदानावरील सभेला संबोधित करताना पंतप्रधान पुढे म्हणाले की, गझनवीला वाटले की त्याने सोमनाथचा नाश केला आहे. तथापि, त्यानंतर लवकरच मंदिर पुन्हा बांधण्यात आले. त्यानंतर खिलजीने मंदिर पाडले. तथापि, जुनागढच्या राजांनी मंदिर पुन्हा बांधले.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी मंदिरात सुमारे ३० मिनिटे पूजा केली. त्यांनी शिवलिंगावर जल आणि फुले अर्पण केली आणि पंचामृताने अभिषेकमृत केला. परत येताना पंतप्रधानांनी पुजारी आणि स्थानिक कलाकारांची भेट घेतली. मोदींनी ढोल (चेंदा वाद्य यंत्र) देखील वाजवला. मोदींनी सकाळी शंख सर्कल येथे शौर्य यात्रेचे नेतृत्व देखील केले.

पंतप्रधान मोदी शनिवारी संध्याकाळी सोमनाथमध्ये पोहोचले. १०२६ मध्ये सोमनाथ मंदिरावर झालेल्या पहिल्या हल्ल्याच्या हजार वर्षपूर्तीनिमित्त येथे सोमनाथ स्वाभिमान पर्व साजरा केला जात आहे. पंतप्रधानांनी स्वतः या कार्यक्रमाला सोमनाथ स्वाभिमान पर्व असे नाव दिले.

आजही आपण सतर्क आणि एकजूट राहिले पाहिजे. आपल्याला फूट पाडू पाहणाऱ्या शक्तींपासून आपण सावध राहिले पाहिजे. आज प्रत्येक नागरिकाचा विकसित भारतावर विश्वास आहे. भारत आपला अभिमान नवीन उंचीवर नेईल. आपण गरिबीविरुद्धची आपली लढाई जिंकू.

मोदी म्हणाले- देशात अशा काही शक्ती आहेत ज्यांनी मंदिराच्या पुनर्बांधणीला विरोध केला ज्या देशाला वारसा आहे त्याला त्याचा अभिमान असतो. तथापि, आपल्या देशाच्या स्वातंत्र्यानंतर, गुलाम मानसिकतेचे लोक तो वारसा विसरले. जेव्हा सरदार पटेल यांनी सोमनाथची पुनर्बांधणी करण्याची प्रतिज्ञा



केली तेव्हा त्यांना रोखण्याचे प्रयत्न झाले. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनाही मंदिरात जाण्यापासून रोखण्यात आले.

गझनवीला वाटले की त्याने सोमनाथ नष्ट केले आहे, पण मंदिर पुन्हा बांधले गेले पंतप्रधान म्हणाले, आजच्या इतिहासाची कल्पना करा. १,००० वर्षांपूर्वी, १०२६ मध्ये, गझनवीने मंदिर नष्ट केले. त्याला वाटले की त्याने सोमनाथ नष्ट केले आहे. पण मंदिराची पुनर्बांधणी लवकरच सुरू झाली. त्यानंतर खिलजीने मंदिर नष्ट केले. पण जुनागढच्या राजांनी ते पुन्हा बांधले.

पंतप्रधान म्हणाले, सोमनाथ किंवा भारत दोन्ही नष्ट झाले नाहीत हा योगायोग आहे की आज सोमनाथ आक्रमणाला १००० वर्षे पूर्ण होत आहेत. आणि आता, त्याच्या पुनर्बांधणीला ७५ वर्षे उलटून गेली आहेत. सोमनाथ नष्ट करण्याचे एक नव्हे तर असंख्य प्रयत्न झाले. परकीय आक्रमकांनी शतकानुशतके भारत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. परंतु सोमनाथ किंवा भारत दोन्ही नष्ट झाले नाहीत.

सोमनाथवर १००० वर्षांपासून ध्वज अजूनही फडकत आहे-पंतप्रधान मोदी आज मी तुमच्याशी बोलत असताना, माझ्या मनात हा प्रश्न येतो की तुम्ही जिथे बसला आहात तिथे १,००० वर्षांपूर्वी वातावरण कसे असेल? आपल्या पूर्वजांनी त्यांच्या श्रद्धेसाठी आपले प्राण धोक्यात घातले.



### सोमनाथची गाथा शब्दात वर्णन करता येणार नाही

ओंकाराचा आवाज आणि मंत्रांचा जप ७२ तास चालू राहिला. सोमनाथच्या १,००० वर्ष जुन्या गाथेचे आणि शौर्य यात्रेचे वर्णन मंत्रमुग्ध करणारे आहे. हा अनुभव शब्दात व्यक्त करता येत नाही.

पंतप्रधान पुढे म्हणाले की, हे वातावरण आणि उत्सव अद्भुत रॅलीला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, हा काळ अद्भुत आहे. हे वातावरण अद्भुत आहे. हा उत्सव अद्भुत आहे. एकीकडे, सर्वोच्च देव, महादेव स्वतः आहेत आणि दुसरीकडे, समुद्राच्या लाटा, सूर्याची किरणे, मंत्रांचे प्रतिध्वनी, श्रद्धेची लाट. या दिव्य वातावरणात तुम्हा सर्व भक्तांची उपस्थिती या प्रसंगाला दिव्य आणि भव्य बनवत आहे. सोमनाथ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून, मला सोमनाथ स्वाभिमान पर्वात सेवा करण्याची संधी मिळाली हे मी एक मोठे भाग्य मानतो.

## प्रभाग १३ मध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी रॅली; परीक्षीत अभिमन्यू पवार यांचे मतदारांना आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय जनता पक्षाच्या प्रभाग १३ मधील अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ शनिवारी जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. सौ. छाया शिवाजी केंद्रे, आल्टे पवनकुमार अर्चना दत्तू, सौ. पांचाळ तुलसी संतोष तसेच हिप्परकर अण्णासाहेब बाळासाहेब यांच्या समर्थनार्थ क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड परिक्षीत अभिमन्यू पवार यांच्या नेतृत्वाखाली भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



प्रभागातील प्रमुख मार्गांवरून निघालेल्या या रॅलीदरम्यान भाजपाच्या विकासात्मक धोरणांचा, केंद्र व राज्य सरकारच्या लोकहितकारी योजनांचा प्रभावीपणे प्रचार करण्यात आला. सबका साथ, सबका विकास या संकल्पनेतून प्रभाग १३ चा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार उमेदवारांनी व्यक्त केला. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

यावेळी ॲड परिक्षीत अभिमन्यू पवार यांनी नागरिकांशी संवाद साधत, प्रामाणिक व विकासाभिमुख नेतृत्वाला पाठबळ देण्याचे आवाहन केले. भाजपचे उमेदवार निवडून दिल्यास प्रभागाचा विकास अधिक गतीने होईल. त्यामुळे येत्या निवडणुकीत भाजप उमेदवारांना मतरूपी आशीर्वाद द्यावा, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

रॅलीदरम्यान कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. घोषणाबाजी, फलक आणि संवादाच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रचारामुळे प्रभाग १३ मध्ये भाजपच्या उमेदवारांच्या विजयाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

## कचरा पेटी उद्याच्या स्वच्छ लातूरच्या उद्देशापोटी, आमचे ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर स्वच्छ, सुंदर, हरित, आरोग्यदायी आणि प्रदूषणमुक्त व्हावे या एका ध्येयाने मागील २४१७ दिवसांपासून अविरत कार्यरत असलेले 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' आज शहरासाठी आशेचा किरण ठरत आहे. आपलं लातूर - स्वच्छ लातूर, सुंदर लातूर, हरित लातूर या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीत उतरवत फाउंडेशनचे सदस्य निःस्वार्थ भावनेने सातत्याने कष्ट घेत आहेत.



आज लातूर शहरात कचरा संकलन व्यवस्था मोठ्या प्रमाणावर सुरळीत होत असली, तरी काही ठराविक लोकांच्या बेफिकीर वृत्तीमुळे अजूनही रस्ते, दुभाजक आणि नाल्यांमध्ये कचरा साचलेला दिसतो. विशेषतः छोटे दुकानदार, हातगाडे व्यावसायिक व खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडे कचरा टाकण्यासाठी पेट्यांचा अभाव असल्याने ही समस्या अधिक गंभीर होत होती.

ही बाब लक्षात घेऊन 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन'ने एक अभिनव आणि प्रेरणादायी उपक्रम राबवला. भंगार दुकानातून तेलाचे रिकामे डब्बे विकत घेऊन, त्यांना रंगरंगोटी करून आकर्षक कचरा पेट्यांमध्ये रूपांतर करण्यात आले. आतापर्यंत ३०० हून अधिक कचरा पेट्या तयार करून त्या शहरातील विविध ठिकाणी वितरीत करण्यात आल्या आहेत. कचऱ्यातूनच स्वच्छतेचा मार्ग शोधणारा हा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून फाउंडेशनने नागरिकांना स्पष्ट आवाहन केले आहे की, कचरा रस्त्यावर, दुभाजकात किंवा नाल्यांमध्ये टाकू नये, कचरा अथवा पाला-पाचोळा पेटवू नये आणि स्वच्छतेसाठी प्रशासनाला सहकार्य करावे. या उपक्रमाचे प्रकल्प प्रमुख सीए श्रीकांत जाधव यांनी सांगितले की, स्वच्छ लातूर हे केवळ प्रशासनाचे नव्हे, तर प्रत्येक नागरिकाचे सामूहिक स्वप्न आहे. ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागणे गरजेचे आहे.

आज 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन'चे सदस्य आपल्या श्रमातून, वेळेतून आणि जिद्दीतून लातूरला हरित भविष्याकडे घेऊन जात आहेत.

हे कार्य म्हणजे केवळ कचरा संकलनाचा प्रयन्त नाही, तर लातूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेली सकारात्मक बिजची पेरणी आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**निहाल सरीनने बुद्धिबळ स्पर्धेत रचला इतिहास!**

### चिमटा दयाचा



लातूरात प्रभाग मोठे असल्याने उमेदवारास मतदारास भेटणे कठिण जात आहे! कुणाचा विजय होइल हे सांगणे कठिण होत आहे!!

## स्थानिक गुन्हे शाखेचा धडाका

## महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांविरोधात लातूर पोलिसांची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या तसेच तरुण पिढीचे भवितव्य उद्ध्वस्त करणाऱ्या महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतूक व विक्रीविरोधात लातूर पोलिसांनी कठोर भूमिका घेत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी सुमारे रु. ११,०९,४९६/- किमतीचा मुद्देमाल जप्त करून अवैध धंदे करणाऱ्यांना कडक संदेश दिला आहे.



दिनांक ०८/०१/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांना माहिती मिळाली की, उदगीर शहरातील उमा चौक ते शिवाजी चौक परिसरात एका पांढऱ्या रंगाच्या टोयोटा ईटॉस कारमधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी वाहतूक करण्यात येत आहे.सदर माहितीचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तत्काळ कारवाईस रवाना झाले.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक उमा चौक परिसरात सापळा लावून उभे असताना वर्णनास जुळणारी टोयोटा ईटॉस कार क्रमांक घटनास्थळी येताच पोलिसांनी तिला थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांची चाहूल लागताच वाहनचालकाने गाडी वेगात पळवून नेण्याचा प्रयत्न केला व एका ठिकाणी गाडीला धक्का देऊन गर्दीचा फायदा घेत गल्लीबोळातून पळून जाऊन फरार झाला.

पोलिसांनी पंचासमक्ष सदर वाहन ताब्यात घेऊन झडती घेतली असता महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले विविध प्रकारचे गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू मोठ्या प्रमाणात मिळून आले. त्यामध्ये ४,०९,४९६/-रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ त्याची वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली टोयोटा ईटॉस कार ( ७,००,०००/- रुपयांची असा एकूण ११,०९,४९६/-रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आवश्यक नमुने रासायनिक विश्लेषणासाठी स्वतंत्ररित्या सील करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा तंबाखू जन्यपदार्थाची चोरटी वाहतूक विक्री करणारा माधव तुकाराम मोरे, वय अंदाजे ३२ वर्षे, रा. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड. हा अंधाराचा फायदा घेऊन फरार झाला असून याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच सहकलम ५९ अन्नसुरक्षा व मानदे अन्वये पोलीस ठाणे उदगीर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

स्थानिक गुन्हे शाखा, लातूर ही संघटित गुन्हेगारी, अवैध धंदे व समाजविघातक कृत्यांविरोधात सातत्याने कठोर कारवाई करत असून, भविष्यातही अशा कारवाया अधिक तीव्र करण्यात येणार आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथकामधील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, मनोज खोसे, आनंद हल्लाळे यांनी केली असून लातूर पोलिसांची ही कारवाई स्पष्ट संदेश देते की, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अवैध धंदे करणाऱ्या विरोधात कठोरात कठोर कारवाई केली जाणार आहे.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## ईडीच्या कारवाईने ममता घाबरल्या

राज्याच्या विकासासाठी, लोकांच्या सुविधेसाठी प्रयत्नात मुख्यमंत्र्यांना राहावे लागते. असे असले, तरी याला बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या अपवाद ठरल्या आहेत. ८ जानेवारीला सकाळी अंमलबजावणी संचालनालयाने ('ईडी'ने) निवडणूक रणनीतीकार संस्था 'आयपॅक'चे प्रमुख प्रतीक जैन यांच्या कोलकात्यातील कार्यालयासह देशभरातील १५ ठिकाणांवर धाडी घातल्या. प्रतीक जैन तृणमूल काँग्रेसच्या माहिती-तंत्रज्ञान विभागाचे प्रमुखही आहेत. या धाडीची माहिती मिळताच संतापलेल्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी थेट धाड घातलेल्या ठिकाणी पोचल्या आणि त्यांनी तेथील अनेक धारिका (फाइल्स) घेऊन स्वतःच्या गाडीत ठेवल्या. या काळात २ वेळा प्रसारमाध्यमांसमोर येऊन 'केंद्र सरकार बळजोरी करत आहे आणि केंद्रीय गृहमंत्री 'बदमाश' आहेत', असे वक्तव्य त्यांनी केले. या नाट्यमय घडामोडीच्या निमित्ताने मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे नीतीहीन वर्तन देशाला पहायला मिळाले. खासगी आस्थापनाच्या कार्यालयावर 'ईडी'ने धाड घातल्यावर राज्याची सगळी कामे सोडून धावलेल्या ममता बॅनर्जी जनतेपासून काय लपवत आहेत ? हा सर्वांत मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. ज्या प्रतीक जैन यांच्या घरावर आणि 'आयपॅक' संस्थेवर ही धाड घातली गेली, त्यांचे धागेदोरे अब्जावधी रुपयांच्या कोळसा घोटाळ्याशी जोडलेले आहेत. जेव्हा केंद्रीय यंत्रणा याचा शोध घेण्यासाठी जाते, तेव्हा राज्याच्या मुख्यमंत्री स्वतःचे सर्व शासकीय दायित्व विसरून एखाद्या आंदोलकाप्रमाणे रस्त्यावर उतरतात. त्यांचे हे कृत्य कुणाला वाचवण्यासाठी आहे ? ज्यांच्या हातामध्ये कायद्याचे रक्षण करण्याची सूत्रे आहेत, त्यांनीच कायद्याचे उल्लंघन करणे, याला काय म्हणायचे ? सामान्यतः मनातील चांदण्यांची सवय चोरांना असतेच; पण मुख्यमंत्री असलेल्या ममतादीदींना चांदण्यांची भीती का वाटत आहे? चांदण्यांच्या या भीतीमागे बंगालमधील कोळसा घोटाळा हे कारण समोर येत आहे. हा काही आजचा घोटाळा नाही. हा सहस्रो कोटी रुपयांचा महाघोटाळा आहे, ज्याने राज्याच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट केली आहे. 'ईस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड'च्या खाणींतून बेकायदेशीरपणे कोळसा उपसून तो काळ्या बाजारात विकला गेला. या कृत्याचा मुख्य सूत्रधार अनुप मांझी उपाख्य 'लाला' असून त्याचे संबंध तृणमूल काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि अगदी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यापर्यंत पोचल्याचा दाट संशय आहे. या कोळसा तस्करीतून मिळालेला काळा पैसा हवालाच्या मार्गाने निवडणूक रणनीती आखणाऱ्या 'आयपॅक'पर्यंत पोचला आणि 'आयपॅक'चे प्रमुख प्रतीक जैन यांच्या माध्यमातून हा पैसा निवडणुकीत वापरला गेल्याचा आरोप आहे. यावरून ममता बॅनर्जी यांनी केलेले आकांडतांडव वरील प्रश्नांचे उगमस्थान आहे. ममता बॅनर्जी त्यांनी त्यांच्या वर्तनातून त्यांना देश, राज्यघटना, राज्य आणि राज्यातील नागरिक यांच्याविषयी कोणतीही 'ममता' नसून केवळ स्वतःच्या पक्षाच्या धारिका अन् 'हार्डडिस्क' यांविषयीच 'ती' आहे, हे दाखवून दिले आहे. 'ममता बॅनर्जी बंगाल राज्य चालवत नाहीत, तर अराजक निर्माण करणारे केंद्र चालवतात', असे म्हटल्यास वावगे नाही. तेथे हिंदूंच्या देवतांच्या मूर्ती फोडल्या जातात, हिंदुत्वनिष्ठांच्या हत्या होतात, हिंदुत्वनिष्ठांच्या शिरच्छेदाची भित्तीपत्रके दिवसाढवळ्या झळकतात, धर्मांध आमदारांची मुले पोलिसांवर हात उगारतात, तृणूमलचा धर्मांध कार्यकर्ता उघडपणे 'जागो माँ' गाणे म्हणणाऱ्या गायिकेच्या अंगावर धावून जातो, हे अल्प पडते; म्हणून डॉक्टर अथवा सामान्य महिलांवर अनन्वित अत्याचार झाल्यावर अत्याचार्यांवर कारवाई न करता महिलांच्या आंदोलनात याच जनताद्रोही ममता बॅनर्जी सहभागी होतात. केंद्रीय प्रशासन अथवा सरकारची विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रिया, समान नागरी कायदा, नागरिकत्व सुधारणा कायदा यांच्या विरोधात मुख्यमंत्री स्वतःच उभ्या रहातात. ममता बॅनर्जी यांच्या मुख्यमंत्री कार्यकाळातील अशा घटनांची सूची न संपणारी आहे. एवढे असूनही ममता बॅनर्जी स्वतः मानवतावादी, धर्मनिरपेक्ष असल्याचे मोठ्या दिमाखात सांगतात. त्यामुळे अशा नानाविध काळ्या कृत्यांनी काळवंडलेल्या ममता शुद्ध असूच शकत नाहीत, हे स्वच्छ सत्य आहे. ममता बॅनर्जी यांनी ईडीच्या कारवाईच्या वेळी केलेल्या बेकायदेशीर कृत्यात बंगाल राज्याच्या पोलिसांनी त्यांना साथ दिली. ज्या पोलिसांनी गुन्हेगारांना पकडायला हवे, तेच पोलीस केंद्रीय अधिकाऱ्यांच्या कामात अडथळे आणत होते. 'मुख्यमंत्री बॅनर्जी आणि पोलीस यांच्या संगनमताने पुराव्यांत फेरफार करण्यात आला आहे', असे ईडीने उच्च न्यायालयात सादर केलेल्या याचिकेत म्हटले आहे. ममता यांनी केलेली चोरी प्रसारमाध्यमांच्या कॅमेर्यात ढळढळीतपणे पकडली गेली, तरीही तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी न्यायालयात मोठा गोंधळ माजवला. त्यामुळे न्यायालयाला या प्रकरणात कारवाई करता आली नाही आणि सुनावणी पुढे ढकलावी लागली. यापूर्वी वर्ष २०१९ मध्ये कोलकाता पोलीस आयुक्त राजीव कुमार यांच्या घरी पोचलेल्या सीबीआय अधिकार्यांच्या पथकाला बंगाल पोलिसांनी कह्यात घेतले होते. तो प्रसंगही मोठा नाट्यमयरित्या घडला होता. ज्या मुख्यमंत्र्यांनी कायद्याचे रक्षण करण्याची शपथ घेतली आहे, त्या स्वतः ईडीने जप्त केलेले पुरावे स्वतःच्या गाडीत भरून तिथून निघून जातात. हे कृत्य म्हणजे 'पुरावे नष्ट करणे' या श्रेणीतील गंभीर गुन्हा आहे. केंद्रीय निमलष्करी दलाच्या सैनिकांना आणि ईडीच्या अधिकार्यांना राज्य पोलिसांच्या बळावर धाक दाखवणे, हा 'राजकीय आतंकवाद' आहे. पक्षपाताविना काम करण्याची घेतलेली शपथ त्या वारंवार पायदळी तुडवत आल्या आहेत. लोकशाही संपवल्याचा आरोप ममता बंगालमध्ये स्वतः कोणत्या लोकशाही तत्त्वाचे पालन करत आहेत ? एखाद्या चित्रपटामध्ये खलनायक जसा कायदा धाब्यावर बसवतो, तसाच प्रकार बंगालमध्ये ममता करत आहेत. बंगालमध्ये सीबीआयच्या अधिकार्यांना बंदी बनवणे असो किंवा आता ईडीच्या कामात अडथळा आणणे असो, ममता बॅनर्जी बंगालमध्ये 'ममताराज' चालवत आहेत, हे उघड आहे. अन्वेषण यंत्रणांचे खच्चीकरण आणि पोलिसांचा दुरुपयोग, तसेच कोणत्याही केंद्रीय यंत्रणा, केंद्र सरकार यांना न बधण्याची त्यांची हेकेखोर वृत्ती बंगालला भारतापासून वेगळे करण्याची चाल आहे, हे येथे समजून घ्यायला हवे.

# कीडनाशक व्यवस्थापन विधेयकाचा मसुदा जारी, केंद्राने सूचना मागवल्या



केंद्र सरकारने कीडनाशक व्यवस्थापन विधेयकाचा आणखी एक मसुदा जारी केला आहे. हे विधेयक कीडनाशक कायदा, १९६८ आणि त्याअंतर्गतच्या कीडकनाशक नियम, १९७१ ची जागा घेईल.

केंद्र सरकारने बुधवारी कीडनाशक व्यवस्थापन विधेयकाचा आणखी एक मसुदा जारी केला. हे विधेयक कीडनाशक कायदा, १९६८ आणि त्याअंतर्गतच्या कीडकनाशक नियम, १९७१ ची जागा घेणार आहे. तंत्रज्ञान आणि डिजिटल पद्धतींचा वापर करून बोगस कीडनाशकांची अधिक कडक कारवाईच्या माध्यमातून विक्री रोखण्याचा यामागील उद्देश आहे. त्यासाठी जास्त दंडात्मक तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत, असे सरकारने अधिकृत निवेदनात म्हटले आहे. या मसुद्यावर ४ फेब्रुवारीपर्यंत सूचना मागवण्यात आल्या आहेत.

बाजारात बोगस आणि भेसळयुक्त कीडनाशके विकली जात असल्याबद्दल शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर हे पाऊल उचलण्यात आले आहे.

जून २०२५ मधील महिनाभराच्या जनजागृती मोहिमेदरम्यान, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अनेक राज्यांतील शेतकऱ्यांच्या बोगस बियाणे आणि कीडनाशकांशी संबंधित तक्रारी ऐकून घेतल्या होत्या. बोगस कीडनाशकांमुळे पीक उत्पादन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर गंभीर परिणाम असल्याचे आढळून आले आहे. किडनाशक फवारणी करताना कोणती खबरदारी घ्याल?

दरम्यान, २०००-०१ पासून, १९६८ च्या मूळ कायद्यात आणि त्याअंतर्गतच्या नियमांमध्ये दुरुस्ती करण्याचे अनेक प्रयत्न झाले. पण त्याला यश मिळाले नाही.

पुरेशी नियामक डेटा संरक्षणाची माहिती नसल्याने, निरीक्षक आणि परवाना आधारित प्रणालींमुळे नवीन रासायनिक घटकांवरील संशोधनास अडथळे येत असल्याबद्दल पीक संरक्षण उद्योगातून चिंता व्यक्त केली जात आहे.

कीटकनाशक फवारणीनंतर जळाले पीक

अधिक माहितीनुसार, या मसुद्यात किमतीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. ही जबाबदारी संबंधित कंपन्यांवर सोपवण्यात आली आहे. ही कंपन्यांसाठी एक प्रमुख चिंतेची बाब ठरू शकते.

अधिकृत निवेदनानुसार, नवीन मसुद्यात पारदर्शकता आणि उत्पादनाचा स्रोत यासारख्या तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगली सेवा मिळेल आणि जीवन सुलभता वाढवण्याचा यामागील उद्देश आहे.

कीडनाशकांवरील प्रशासकीय नियंत्रण आणि व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून जीवन सुलभता आणि व्यवसायातील सुलभता यांच्यात समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

या विधेयकाच्या माध्यमातून भारताच्या कीडनाशकांवरील नियामक चौकटीचे आधुनिकीकरण करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. पण त्यात अनेक त्रुटी असून ज्या दूर करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# थंडीमध्ये दूध उत्पादन कमी का होते?





थंडीचा थेट परिणाम दुधाळ गाई-म्हशी, वासरे आणि इतर जनावरांच्या आरोग्यावर होतो. अनेक वेळा दूध उत्पादन कमी होते, जनावरे अशक्त होतात आणि आजारांचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडीच्या काळात जनावरांची विशेष काळजी घेणे शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे ठरते.

हिवाळ्यात तापमान मोठ्या प्रमाणात कमी होते. या थंडीचा थेट परिणाम दुधाळ गाई-म्हशी, वासरे आणि इतर जनावरांच्या आरोग्यावर होतो. अनेक वेळा दूध उत्पादन कमी होते, जनावरे अशक्त होतात आणि आजारांचे प्रमाण वाढते. त्यामुळे थंडीच्या काळात जनावरांची विशेष काळजी घेणे शेतकऱ्यांसाठी खूप महत्त्वाचे ठरते.

**१. खाण्याची सवय आणि पोषण**

थंडीमध्ये जनावरांची भूक थोडी वाढते, कारण शरीर उबदार ठेवण्यासाठी जास्त ऊर्जा लागते. मात्र हिवाळ्यात कुरणात चांगले गवत कमी मिळते. अनेक वेळा जनावरे फक्त कोरडा चारा खातात. त्यामुळे प्रथिने व ऊर्जेची कमतरता निर्माण होते. याचा परिणाम थेट जनावरांच्या ताकदीवर आणि दूध उत्पादनावर दिसतो.

थंडीमध्ये दुधाळ जनावरांच्या आहारात काय बदल करावे?

**२. पचनशक्तीवर परिणाम**

थंडीमुळे जनावरांच्या शरीरातील रक्तप्रवाह पोट, आतडी व पचनसंस्थेकडे कमी होतो. त्यामुळे अन्न नीट पचत नाही. विशेषतः लहान वासरांवर याचा जास्त परिणाम होतो. पचन कमजोर झाल्याने जनावरे लवकर थकतात आणि वजन घटते.

**३. दूध उत्पादन घटण्याची कारणे**

थंडीमध्ये सडांकडे जाणारा रक्तप्रवाह कमी होतो. तसेच शरीर उबदार ठेवण्यासाठी जास्त ऊर्जा खर्च होते. त्यामुळे दूध तयार होण्यासाठी लागणारी ऊर्जा कमी पडते आणि दूध उत्पादन घटते. जास्त काळ थंडी राहिल्यास दुधातील साखरेचे प्रमाणही कमी होऊ शकते.

**४. गाभण जनावरांवर व प्रजननावर परिणाम**

योग्य सकस चारा न मिळाल्यास गाभण जनावरांना अशक्तपणा येतो. काही वेळा गर्भधारणा उशिरा होते किंवा गाई पुन्हा गाभण राहत नाहीत. नवजात वासरे कमी वजनाची आणि कमजोर जन्माला येतात. चिकाची गुणवत्ता कमी झाल्यामुळे वासरांची प्रतिकारशक्तीही घटते.

**५. खनिजांची कमतरता व वाढीवर परिणाम**

हिवाळ्यात मॅग्नेशियमसारख्या खनिजांची कमतरता होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे भूक कमी होते आणि वाढ मंदावते. जनावरांची स्नायू वाढ नीट होत नाही आणि मांसाची गुणवत्ता घसरते.

६. तीव्र थंडीतील धोके

खूप जास्त थंडी पडल्यास जनावरांचे शरीराचे तापमान कमी होते. सड, कान आणि अंडकोष थंडीने जास्त बाधित होतात. गंभीर अवस्थेत जनावर बेशुद्ध पडू शकते आणि श्वासोच्छ्वास मंद झाल्याने मृत्यूचा धोका निर्माण होतो.

# सफरचंद खाण्याची योग्य पद्धत माहिती आहे का?

सफरचंद हे सहज मिळणारे, चवदार आणि पोषणमूल्यांनी भरपूर असे फळ आहे. मात्र फक्त सफरचंद खाल्ले म्हणजे त्याचे सर्व फायदे मिळतात असे नाही, तर ते योग्य पद्धतीने खाल्ले तरच शरीराला त्याचा पूर्ण लाभ होतो. रोजच्या आहारात सफरचंदाचा समावेश कसा करावा आणि त्याचे फायदे काय आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. मात्र मीठ लाऊन किंवा साखर लावलेले सफरचंद न खाता ते कसे खावे हे जाणून घ्या.

सफरचंद खाण्याची योग्य पद्धत पाहिली तर सर्वात आधी ते नीट स्वच्छ धुणे गरजेचे आहे. सफरचंदाच्या सालीवर कीटकनाशकांचे अंश, धूळ आणि जंतू असू शकतात, त्यामुळे स्वच्छ पाण्याखाली चोळून धुवावे. शक्य असल्यास मीठ किंवा व्हिनेगर घातलेल्या पाण्यात काही मिनिटे ठेवून मग धुतले तरी चांगले. सफरचंद सोलून खाण्यापेक्षा सालासकट खाणे अधिक फायदेशीर ठरते, कारण सालात फायबर आणि अँटी ऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. सकाळी उपाशीपोटी किंवा नाश्त्यानंतर सफरचंद खाल्ल्यास पचनशक्ती चांगली राहते. जेवणानंतर लगेच सफरचंद खाणे टाळावे, कारण त्यामुळे पचन मंदावू शकते आणि पोट फुगण्याचा त्रास होऊ शकतो. सफरचंद चावून, हळूहळू खाल्ल्यास त्यातील पोषणद्रव्ये शरीराला चांगल्या प्रकारे मिळतात. लहान मुलांना किंवा ज्येष्ठांना थेट खाणे अवघड जात असेल तर सफरचंदाचे छोटे तुकडे करून, वाफवून किंवा स्मूदी स्वरुपात देता येते. सफरचंद खाण्याचे फायदे अनेक आहेत. सफरचंदात असलेले फायबर पचनक्रिया सुधारण्यास मदत करते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास कमी करते. नियमित सफरचंद खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते, त्यामुळे अनावश्यक खाणे टळते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. सफरचंदात असलेले अँटी ऑक्सिडंट्स शरीरातील घातक घटक कमी करतात आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. हृदयाच्या आरोग्यासाठीही सफरचंद उपयुक्त आहे, कारण ते कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करते. मधुमेह असलेल्या व्यक्तींनीही योग्य प्रमाणात सफरचंद खाल्ल्यास रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते. सफरचंदातील जीवनसत्वे आणि खनिजे त्वचा निरोगी ठेवण्यास तसेच केस मजबूत करण्यास उपयुक्त ठरतात.

एकंदरीत पाहता, सफरचंद हे रोजच्या आहारात सहज समाविष्ट करता येणारे आणि अनेक आरोग्यदायी फायदे देणारे फळ आहे. योग्य पद्धतीने आणि योग्य वेळेला सफरचंद खाल्ले तर त्याचा लाभ केवळ पोटापुरता मर्यादित न राहता संपूर्ण शरीराला मिळतो. शिवाय ते बाधत नाही. सगळ्यांसाठी चांगले असते.

## पशुपालनातील मिथेन उत्सर्जनाचे परिणाम

जनावरांच्या रूमेनमधील आंतरिक किण्वन प्रक्रियेमुळे तंतुमय वनस्पती अन्न व तंतूमध्ये रूपांतरित होतात. या प्रक्रियेत मेथॅनोजेनेसिस जिवाणू क्रियेमुळे मिथेन वायूची निर्मिती होते. हा अत्यंत शक्तिशाली हरितगृह वायू आहे

जनावरांच्या रूमेनमधील आंतरिक किण्वन प्रक्रियेमुळे तंतुमय वनस्पती अन्न व तंतूमध्ये रूपांतरित होतात. या प्रक्रियेत मेथॅनोजेनेसिस जिवाणू क्रियेमुळे मिथेन वायूची निर्मिती होते. हा अत्यंत शक्तिशाली हरितगृह वायू आहे. हा वायू पशू श्वासोच्छ्वास, ढेकर देणे किंवा जिरण प्रक्रियेद्वारे तोंड व नाकावाटे वातावरणात सोडतात. मिथेन निर्मिती म्हणजे प्रत्यक्षात पशुखाद्यातील उपयुक्त पचनीय ऊर्जेची हानी, त्यामुळे आहार ऊर्जेचा अपुरा वापर होतो.

जागतिक तापमानवाढ म्हणजे पृथ्वीच्या सरासरी तापमानात सातत्याने होणारी वाढ. पृथ्वी गरम होत चालल्यामुळे चक्रीवादळांची वारंवारता, दुष्काळ, पूर, जंगलातील आगी अशा आपत्ती वाढत आहेत. गेल्या १०० वर्षांत पृथ्वीच्या पृष्ठभागाजवळील हवेचे सरासरी तापमान सुमारे १ अंश सेल्सिअस पेक्षा थोडे कमी वाढले आहे. ही वाढ दिसायला कमी वाटत असली, तरी याच वाढीमुळे गेल्या १० ते १५ वर्षांत तीव्र वादळे, मोठे पूर आणि भीषण वणवे अधिक प्रमाणात दिसून आले आहेत.

हवामानविषयक आकडेवारीनुसार १ अंश सेल्सिअस तापमानवाढीमुळे पृथ्वी किमान हजार वर्षांतील सर्वाधिक उष्ण अवस्थेत पोहोचली आहे. नोंदविलेल्या २० सर्वात उष्ण वर्षांपैकी १९ वर्षे १९८० नंतरची आहेत, तर आजवरची तीन सर्वाधिक उष्ण वर्षे गेल्या आठ वर्षांतच नोंदली गेली आहेत. ही समस्या केवळ पृथ्वी किती गरम होते याची नाही, तर ती किती वेगाने गरम होते याची आहे. नैसर्गिक हवामान बदल (हिमयुग आणि मधले उष्ण कालखंड) साधारणपणे ५०,००० ते १,००,००० वर्षांच्या कालावधीत घडत असतात. मात्र गेल्या केवळ ३० वर्षांत झालेली झपाट्याने तापमानवाढ इतिहासात कधीही घडलेली नाही. या सर्व तथ्यांवरून शास्त्रज्ञ असा निष्कर्ष काढतात की सध्याची जागतिक तापमानवाढ ही नैसर्गिक नसून मानवनिर्मित आहे.

वातावरणातील हरितगृह वायूंच्या वाढत्या एकाग्रतेमुळे पृथ्वीच्या वातावरणीय तापमानात वाढ होत आहे, या घटनेला जागतिक तापमानवाढ असे म्हटले जाते. गेल्या काही दशकांत पृथ्वीचे सरासरी तापमान लक्षणीयरीत्या वाढले असून, आंतरसरकारी हवामान बदल पॅनेलच्या अहवालानुसार २१०० पर्यंत जागतिक तापमानात १.८ ते ३.९ अंश सेल्सिअस इतकी वाढ होण्याची शक्यता आहे. सध्याची धोरणे आणि विकासाची दिशा कायम राहिल्यास, या शतकाच्या अखेरीस पृथ्वीचे तापमान १.४ ते ५.८ अंश सेल्सिअसपर्यंत वाढू शकते. शास्त्रज्ञांमध्ये अभूतपूर्व एकमत दिसून येत असून, भविष्यात अधिक तीव्र, जलद आणि अनपेक्षित हवामान बदल होण्याचा इशारा देण्यात आला आहे. याचे परिणाम शेती, पशुधन, पाणी उपलब्धता आणि मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात जाणवणार आहेत.

**हरितगृह वायू, पशुपालन आणि हवामान बदल**

हरितगृह वायूंपैकी मिथेन हा वातावरणातील अत्यंत महत्त्वाचा घटक असून त्याचा थेट संबंध पशुपालनाशी आहे. सध्या जागतिक स्तरावर होणाऱ्या हरितगृह वायू उत्सर्जनाचा मोठा भाग रवंथ करणाऱ्या जनावरांच्या पचन प्रक्रियेतून तसेच शेणखत व मूत्र व्यवस्थापनातून निर्माण होत आहे. विकसनशील देशांमध्ये प्रामुख्याने चराईवर आधारित पशुपालन आणि पारंपरिक लघू-स्तरीय मिश्र शेती प्रणाली यांमधून हे उत्सर्जन अधिक प्रमाणात होत आहे.

हवामान बदलाचे परिणाम केवळ तापमानवाढीपुरते मर्यादित नसून, त्याचे दीर्घकालीन आणि व्यापक पर्यावरणीय परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. जागतिक तापमान वाढल्यास समुद्रपातळी वाढू शकते, ज्यामुळे अनेक किनारी दलदलीचे प्रदेश तसेच काही लहान राष्ट्रे पूर्णतः पाण्याखाली जाण्याचा धोका आहे. त्याचप्रमाणे जंगले नष्ट होण्याची, अनेक वनस्पती व प्राणी प्रजाती नामशेष होण्याची किंवा त्यांच्या वैशिष्ट्यांमध्ये बदल होण्याची शक्यता वाढत आहे.

हवामान बदलामुळे संसर्गजन्य रोगांचा उद्रेक व प्रसार होण्याची शक्यता अधिक असून, पशुधनात उष्माघात, श्वसनसंस्थेचे आजार तसेच हवेच्या प्रदूषणामुळे होणारे रोग वाढू शकतात. याचा थेट परिणाम पशूंच्या आरोग्यावर, उत्पादनक्षमतेवर आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. हवामान बदलामुळे पशुधन उत्पादनक्षमतेवर होणारे परिणाम स्पष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये तापमानवाढ, चाऱ्याची घटती गुणवत्ता, पाणीटंचाई, रोगांचा वाढता प्रसार, प्रजनन कार्यक्षमतेत घट आणि मृत्युदरात वाढ यांचा समावेश होतो. त्यामुळे पशुधन क्षेत्रात हवामान-संवेदनशील धोरणे आणि शाश्वत व्यवस्थापन पद्धती अवलंबणे अत्यावश्यक आहे.

जागतिक स्तरावर कृषी क्षेत्रातून होणारे हरितगृह वायू उत्सर्जन एकूण जागतिक रेडिएटिव्ह फोर्सिंगपैकी सुमारे २५.५ टक्के आहे, तसेच मानवनिर्मित उत्सर्जनाच्या ६० टक्क्यांहून अधिक वाटा कृषी क्षेत्राचा आहे. यामध्ये पशुपालन क्षेत्राचा वाटा सुमारे १८ टक्के असून, ते जागतिक तापमानवाढीस कारणीभूत ठरणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक आहे. विशेषतः मिथेन वायूचे उत्सर्जन अत्यंत चिंताजनक आहे. मिथेनमुळे होणारा उष्णतावर्धक प्रभाव हा इतर सर्व कार्बन डायऑक्साइड व्यतिरिक्त हरितगृह वायूंच्या एकत्रित प्रभावाइतका आहे. औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत सध्या एकूण हरितगृह वायूंचे प्रमाण सुमारे ३९ टक्क्यांनी वाढले आहे, तर मिथेनचे प्रमाण दुपटीपेक्षा अधिक वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, कृषी क्षेत्रातून विशेषतः पशुधन उत्पादनातून होणारे हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे ही सर्वोच्च प्राधान्याची बाब ठरते, कारण यामुळे जागतिक तापमानवाढ तुलनेने जलद गतीने आटोक्यात आणता येऊ शकते.

मिथेनची भूमिका आणि हवामान बदल

मिथेन हा हरितगृह वायूंमधील एक अत्यंत महत्त्वाचा घटक असून, हरितगृह परिणामात कार्बन डायऑक्साइड नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. वातावरणात उष्णता अडकवून ठेवण्याची मिथेनची क्षमता फार जास्त आहे. वजनाच्या तुलनेत (ग्रॅम/ग्रॅम आधार) मिथेनची उष्णता अडवून ठेवण्याची क्षमता कार्बन डायऑक्साईडपेक्षा सुमारे २१ पट अधिक आहे.

मिथेनचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे वातावरणातील आयुष्य तुलनेने कमी (सुमारे १० ते १२ वर्षे) आहे, तर कार्बन डायऑक्साइडचे आयुष्य १०० ते १२० वर्षांपर्यंत असते. त्यामुळे मिथेनचे उत्सर्जन कमी केल्यास हवामान बदलावर लवकर आणि स्पष्ट सकारात्मक परिणाम दिसून येतात. सध्या मानवनिर्मित मिथेन उत्सर्जन कमी करण्यासाठी कमी खर्चीक आणि व्यवहार्य तंत्रज्ञान उपलब्ध आहे.

औद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत वातावरणातील मिथेनचे प्रमाण गेल्या दोन शतकांत दुपटीपेक्षा अधिक वाढले आहे. मिथेन उत्सर्जन हे नैसर्गिक तसेच मानवनिर्मित स्रोतांमधून होते. यामध्ये सुमारे ३० टक्के मिथेन नैसर्गिक स्रोतांमधून (दलदलीचे प्रदेश, महासागर व गोड्या पाण्याचे स्रोत) येतो, तर उर्वरित ७० टक्के मिथेन मानवनिर्मित क्रियांमधून उत्सर्जित होतो. मानवनिर्मित मिथेन उत्सर्जनात पशुधन (रवंथ करणारे व रवंथ न करणारे प्राणी), भातशेती, नैसर्गिक वायू व पेट्रोलियमचे उत्खनन व वापर, कोळसा खाणकाम, कचरा डेपो, पशुखत व सांडपाणी प्रक्रिया यांचा प्रमुख वाटा आहे. एकूण जागतिक तापमानवाढीपैकी सुमारे १९ टक्के वाटा मिथेन उत्सर्जनाचा असल्याचे मानले जाते.

# शिवलिंगेश्वर फार्मसी कॉलेज, आलमला येथे भव्य दीक्षांत समारंभ; पदवीधरांचा जल्लोष

**औसा/प्रतिनिधी:** तालक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात एम. फार्मसी, फार्म. डी., फार्म. डी. (पोस्ट बॅक्युलॅरेट) आणि बी. फार्मसी या अभ्यासक्रमात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. १० जानेवारी २०२६ रोजी आयोजित भव्य दीक्षांत समारंभात पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. हा सोहळा केवळ शैक्षणिक यशाचा उत्सवच नव्हता, तर विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एक प्रेरणादायी प्रसंग ठरला.



पदवी प्रमाणपत्रांचे वाटप आलमला गावचे सुपुत्र प्रताप गोरख वाघमारे, उपजिल्हाधिकारी व विशेष भूसंपादन अधिकारी, वर्धा, डॉ. एस. जी. गट्टानी, वरीष्ठ प्राध्यापक, स्कूल ऑफ फार्मसी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. नितीन बी. घीवारे, प्राध्यापक, नांदेड फार्मसी कॉलेज, नांदेड, व संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

प्रताप गोरख वाघमारे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात फार्मसी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले, फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी संशोधनाद्वारे देशाचा विकास साधावा. तुमच्या जीवनातून लोकांना प्रेरणा मिळेल असे कार्य करा. तुमची ऊर्जा समाजासाठी सकारात्मक आणि फायदेशीर कार्यांसाठी वाहा. हे केवळ तुमचे वैयक्तिक यश नसून, समाजाच्या प्रगतीचे साधन ठरेल, त्यांच्या या शब्दांनी उपस्थित सर्वांमध्ये उत्साह संचार झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे उपस्थित होते. मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे, योगेश धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, डॉ. समीर शफी, डॉ. सुरज मालपानी, डॉ. सचिन हंगरगेकर, डॉ. अजय फुगटे आणि परीक्षा विभाग प्रमुख प्रा. सय्यद अब्दुल अजीम हे उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा. सय्यद अब्दुल अजीम यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रवासाची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी हे केंद्रबिंदू मानून आम्ही शैक्षणिक व सामाजिक कार्य करीत आहोत. अत्याधुनिक व्यावसायिक शिक्षण उपलब्ध करून विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्याचे कार्य करीत आहोत. संस्थेच्या विविध युनिट्समध्ये महाराष्ट्र आणि देशभरातील हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

डॉ. एस. जी. गट्टानी यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून तुमचे करिअर घडवा. फार्मसी क्षेत्रात डिजिटल टूल्सचा वापर करून नवीन संधी शोधा असे प्रतिपादन केले. त्यांचे बोलणे विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणारे ठरले.

डॉ. नितीन घीवारे यांनी फार्मसी व्यावसायिक जीवनावर प्रकाश टाकत म्हटले तुमचे ज्ञान व्यावसायिक यशासाठी वापरा. सौंदर्यप्रसाधन उत्पादन व्यवसायात अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. इंडस्ट्री ट्रेंड्सचा अभ्यास करा आणि नवीन उत्पादने विकसित करा. त्यांचे बोलणे विद्यार्थ्यांना व्यावहारिक दृष्टिकोन देत गेले.

कार्यक्रमात पुढे माजी विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला. पदवीधर व माजी विद्यार्थ्यांनी जीवनातील हा शैक्षणिक टप्पा यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आनंद जल्लोषात साजरा केला. व्यासपीठावर पदवी प्रदान होत असताना शिक्षक, कुटुंबीय, मित्रपरिवार यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत होता. हा विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ प्रत्येक पदवीधराच्या जीवनातील संस्मरणीय क्षण ठरला. माजी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि समाधानाची लहर उसळली, तर संस्थेच्या वतीने सर्वांना अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरज मालपानी यांनी केले, तर आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे यांनी मानले.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात रोजगार मेळाव्याचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी:** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील करिअर व प्लेसमेंट सेल आणि ग्लोबलस्पेस टेक्नॉलॉजीज लि. आणि गिरीज टेक हब प्रायव्हेट लिमिटेडच्या संयुक्त विद्यमाने दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, दयानंद शिक्षण संस्थेचे टीपीओ अनिल बिरादार, कार्यक्रम समन्वयक डॉ.महेश करळे, सहसंयोजक डॉ.रोहिणी शिंदे, गिरीज टेक हब प्रायव्हेट लिमिटेडचे मॅनेजर अमित पाठक व तांत्रिक सहाय्यक विश्वजीत स्वामी, गिरीज टेक हब पुणे प्रा. सुजाता काळे, बिडवे इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रीती बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे असे म्हणाले की, महाविद्यालयामध्ये वेळोवेळी असे रोजगार मेळावे घेतले जातात, त्या मेळाव्याचा सर्व विद्यार्थ्यांनी फायदा करून घ्यावा व जास्तीत जास्त विद्यार्थी अशा मेळाव्यामध्ये जॉबला लागावेत व त्यांनी आपले तसेच महाविद्यालयाचे व संस्थेचे नावलौकिक करावे. तसेच भविष्यात आणखीन अशा प्रकारचे रोजगार मेळावे घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थी जॉबला लागावेत यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत.

प्रास्ताविकमध्ये अनिल बिरादार यांनी कंपनीबद्दल सर्व माहिती दिली व रोजगार मेळावा आणि पगार याबद्दल मार्गदर्शन केले. आभार डॉ.महेश करळे यांनी मानले. सूत्रसंचालन वीणा भंडारी या विद्यार्थीनीने केले. या ड्राईव्हमध्ये बी.सी.एस.चे ७० विद्यार्थी, बी.एस्सी.तृतीय वर्षाचे ९ विद्यार्थी, एमसीएचे पाच विद्यार्थी, एम.एस्सी.चे तीन विद्यार्थी आणि बीसीएचे ११ विद्यार्थी असे एकूण ९८ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी महाविद्यालयातील इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# आचरसंहिता कक्षाअंतर्गत भरारी पथकाने केले ०२ गुन्हे दाखल

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर महानगरपालिका निवडणूकी मधील महत्वाचा भाग म्हणजे प्रचार- सर्वच राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर सभा, मिरवणूक, विविध वाहनाद्वारे प्रचार, तसेच होर्डिंग व बनर लावून प्रचार करत आहेत. सदर प्रचार होत असताना आचरसंहिता कक्षाअतर्गत कार्यरत ऋडढ व तडढ पथकाद्वारे सर्व उमेदवारांच्या प्रचारावर काटेकोरपणे लक्ष ठेवण्यात येत आहे त्यानुसार राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्याकडून लावण्यात आलेले विविध होर्डिंग व बॅनर परवानगीची पडताळणी करून विनापरवानगी होर्डिंगवर ०२ गुन्हे भरारी पथकामार्फत करण्यात आलेले आहे. तसेच निवडणूक कालावधीमध्ये पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागमार्फत २६९ लक्ष इतक्या किंमतीची १४६२.२५ लिटर मद्य जप्त करण्यात आलेली आहे तसेच पोलीस विभागामार्फत ४०९ व्यक्तीवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

उपजिल्हाधिकारी तथा आचरसंहिता कक्ष प्रमुख श्रीमती आम्रपाली कासोदेकर यांनी वेळोवेळी बैठका घेवून ऋडढ व तडढ पथकांनी आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याच्यावर सक्त कारवाई करण्याच्या निर्देश देण्यात आलेले आहेत. तरी याद्वारे सर्व राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवार यांना आवाहन करण्यात येते की, प्रचार करत असताना आचारसंहितेचा भंग होणार नाही याची काळजी व्हावी तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आचारसंहिता भंगाचे प्रकार निदर्शनास आल्यास आचरसंहिता कक्षास संपर्क करावा व भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पडतील याकरिता सर्वांनी सहकार्य करावे.

# स्वयंपाकघराकडून जागतिक बाजारपेठकडे! लातूरमधील लघुउद्योजकांच्या जिद्दीला सौ. अदिती अमित देशमुख यांचे पाठबळ

**लातूर/प्रतिनिधी:** लातूरच्या औद्योगिक आणि व्यावसायिक नकाशावर आता महिला आणि स्थानिक लघुउद्योजकांनी आपली मोहोर उमटवायला सुरुवात केली आहे. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित महिला उद्योजिका व्हीडीएफ बाजार या उपक्रमातून प्रेरणा घेऊन अनेक लघुउद्योग आता भरारी घेत आहेत. याच उद्योजकांच्या संघर्षाची आणि यशाची प्रचिती घेण्यासाठी ट्वेंन्टीवन ॲग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांनी लातूर शहरातील विविध प्रभागांतील लघुउद्योगांना भेटी देऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला.

व्हीडीएफ बाजार: आत्मनिर्भरतेचे हक्काचे व्यासपीठ

दिवाळीच्या मुहूर्तावर आयोजित करण्यात आलेल्या व्हीडीएफ बाजार या उपक्रमाचे फलित आता दिसू लागले आहे. या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही स्टॉल फीस भांडे न आकारता महिलांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे उद्योजिकांच्या खर्चात बचत होऊन त्यांना थेट नफा मिळाला आणि त्यांच्या उत्पादनांना मार्केटिंगसाठी मोठे व्यासपीठ मिळाले.

विविध लघुउद्योगांना सदिच्छा भेटी

सौ. अदितीताई देशमुख यांनी लातूर शहरातील प्रभाग निहाय विविध उद्योजकांच्या कार्यस्थळी जाऊन उत्पादनाची गुणवत्ता, स्वच्छता आणि



पॅकेजिंगची पाहणी केली.

खाद्यपदार्थ आणि गृहउद्योग: मातोश्री पापड उद्योग (प्रभाग १८): धिरजकुमार भनगीरे यांच्या या उद्योगातील शिस्त आणि पारंपारिक चवीचे त्यांनी कौतुक केले.

योगेश बडवे यांचा चिकी उद्योग (प्रभाग १७): स्वयंपाकघरातून सुरू झालेला हा प्रवास आता दर्जेदार ब्रँडकडे वाटचाल करत आहे.

दुर्वा लोणचे व मसाले (प्रभाग १७): अश्विनी शिंदे यांची जिद्द आणि उत्पादनातील व्यावसायिकतेची त्यांनी वाखाणणी केली.

दिशा पापड (प्रभाग १७) व लिज्जत पापड केंद्र (प्रभाग २): प्रतिभा गायकवाड आणि शिलाताई वाघमारे यांच्या कष्टाने उभा राहिलेला हा व्यवसाय महिला सक्षमीकरणाचा आदर्श आहे.

शबानाज किचन (प्रभाग ९) व आशा बगदाळकर यांचा फूड पॅकेजिंग उद्योग (प्रभाग १): घरगुती चवीला आधुनिक पॅकेजिंगची जोड देऊन या महिलांनी मोठी प्रगती केली आहे.

**फॅशन आणि टेलरिंग:**

रेखा रोकडे (फॅशन मटेरिअल), पूजा सुरज पत्की (साडी व ड्रेसेस), शामल साडी सेंटर (शामल पवार) आणि आशा मीरा देशमुख (ॲडव्हान्स टेलरिंग): या महिलांनी फॅशन क्षेत्रात स्थानिक बाजारपेठेचा अभ्यास करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**उमंगच्या मुलांची जिद्द**

विशेष म्हणजे, सौ. अदितीताईंनी नवीन एमआयडीसी भागातील उमंग इन्स्टिट्यूट सेंटरला भेट दिली. या सेंटरमधील मुलांनी व्हीडीएफ बाजारमध्ये तयार केलेल्या वस्तूंच्या माध्यमातून आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले. या मुलांच्या हाताला काम आणि कलेला सन्मान मिळावा, यासाठी आमचे कुटुंब सदैव पाठीशी असेल, असा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

लातूरचे अर्थचक्र अधिक बळकट करू या भेटींदरम्यान महिलांशी संवाद साधताना सौ. अदिती अमित देशमुख म्हणाल्या की, ''जेव्हा घराची चौकट ओलांडून एखादी महिला उद्योजिका बनते, तेव्हा ती फक्त स्वतःलाच नाही तर संपूर्ण कुटुंबाला आणि पर्यायाने शहराच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देते. व्हीडीएफ बाजारच्या माध्यमातून आम्ही दिलेली संधी आणि या भगिनींनी घेतलेली मेहनत याचे फलित आज या यशस्वी व्यवसायांच्या रूपात दिसत आहे. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे आणि स्वदेशीचा अभिमान बाळगणे ही आपली जबाबदारी आहे.''

यावेळी अनेक उद्योजिकांनी सण-उत्सवांच्या निमित्ताने व्हीडीएफ बाजारसारखे उपक्रम वारंवार राबवावेत, अशी मागणी केली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत, आगामी काळात महिलांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# विकास आणि पारदर्शकतेसाठी भाजपाला आशीर्वाद द्या: डॉ. सौ.अर्चनाताई पाटील चाकूरकर

**लातूर/प्रतिनिधी:** भाजपाकडे सामान्य जनतेच्या हिताला प्राधान्य आहे. पारदर्शकतेला प्राथमिकता असून लातूरचा विकास साधण्यासाठी नागरिकांनी भाजपच्या उमेदवारांना आशीर्वाद देत महानगरपालिकेत पाठवावे, असे आवाहन भाजपा नेत्या डॉ. सौ.

अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपाचे उमेदवार गणेश गवारे, ज्योती आवसकर, मीनाताई गायकवाड व गौरव काथवटे यांच्या प्रचारासाठी प्रभागातील गांधीनगर भागात आयोजित सभेत डॉ.चाकूरकर बोलत होत्या. या सभेस राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, ज्येष्ठ नेते जयंत काथवटे, दिग्विजय काथवटे व मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ.सौ.

अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, जात-पात न मानता मानव ही एकच जात आहे, असे मानणारा भाजपा हा पक्ष आहे. सामान्य जनतेचे हित डोळ्यासमोर ठेवून भाजपाकडून विकासाच्या योजना राबवल्या जातात. योजनांचा लाभ थेट नागरिकाला मिळावा अशा योजना सरकारने आखल्या आहेत, असेही त्या म्हणाल्या. ताईंनी यावेळी भाषण न करता नागरिकांशी थेट संवाद साधला. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. समस्या ऐकून घेत त्यावर उपाययोजना करण्याचे आश्वासनही दिले.




कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. भाजपाने शहर विकासाचा आराखडा तयार केला आहे. पुणे- मुंबई सारख्या शहराच्या धर्तीवर लातूरचा विकास साधावयाचा असेल तर त्याला भाजपाच हवा, असे ते म्हणाले.

या प्रसंगी प्रभागातील नागरिक, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# ऐश्वर्या चिकटे यांनी अजितदादांना बांधले विजय बंधन!

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर शहर महानगरपालिका निवडणूकीच्या प्रचाराची रणधुमाळी चांगलीच रंगत आहे. शुक्रवारी राष्ट्रवादी कॉँग्रेस - रिपब्लिकन सेना युतीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे विराट अशी विजय संकल्प सभा झाली. प्रभाग सात मधील उच्च विद्या विभुषित, राष्ट्रवादी कॉँग्रेस-रिपब्लिकन सेनेच्या उमेदवार कु. ऐश्वर्या चिकटे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादांना विजय बंधन बांधून त्यांचे स्वागत केले आणि विजयाची हमी दिली.




प्रभाग सात मधील राष्ट्रवादी कॉँग्रेस-रिपब्लिकन सेना युतीचे उमेदवार सचिनभाऊ मस्के, कु. ऐश्वर्या चिकटे आणि अब्दुल गफार मणियार तसेच व्हीएस पॅन्थर संघटने तथा राष्ट्रवादी कॉँग्रेसचे नेते विनोद भाऊ खटके, रिपब्लिकन सेनेचे राज्य सचिव प्रा. युवराज धसवाडीकर, बौद्धाचार्य केशव कांबळे, सुशीलकुमार चिकटे आदींनी प्रभागातील मतदारांसह भव्य अशी प्रचार रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, साळे गल्ली, मिरकले कॉर्नर, मस्जिद रोड, हत्ते चौक, महात्मा गांधी चौक मार्गे सभेच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर पोहचली. रॅली दरम्यान ' एक संधी नव्या पर्वाला, एक संधी नव्या विकासाला, अशा घोषणा देऊन राष्ट्रवादीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. या रॅलीमध्ये प्रभाग सात मधील महिला पुरुष, तरुण मतदार हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते.

# कलानगरी वेलफेयर सोसायटी अमरावतीचा पाचवा वर्धापन दिन व गुणगौरव २०२६ कार्यक्रम दिमाखात संपन्न !

लातूर/प्रतिनिधीः अंबानगरी अर्थात अमरावतीत कलानगरी वेलफेयर सोसायटीचा पाचवा वर्धापन दिन ८ जानेवारी रोजी अमरावती येथे दिमाखात संपन्न झाला. त्याप्रसंगी एड. संतोष शिंदे, पुणे, संस्थापक फैमिली वेलफेयर रिसर्च एण्ड ट्रेनिंग सोसायटी, अध्यक्ष पुरूष हक्क संरक्षण समिति, पुणे यांस सामाजिक कार्याबद्दल पुरस्काराने तसेच विशेष सत्कारार्थी श्रीमती इंदुमती गोंडाने, श्रीमती करूणा कदम त्याचप्रमाने सामाजिक व कला, साहित्य क्षेत्रातिल कार्यरत अन्य मान्यवर व्यक्तिना देखिल गौरवीण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ प्रीति साहू, संपादिका वुमेन्स २४ न्यूज चैनल, उद्घाटक सौ अनुष्का बेलोरकर समाजसेविका, विशेष अतिथि श्री विजयकुमार खंडारे सिने कलावंत, बाल कलाकार यश वाकडे, श्री रवि वानखेडे कंटेंट क्रियेटर, प्रमुख पाहुणे सौ जोसना करवाड़े संपादिका दै .युवक आधार विदर्भ, श्रीमती नीलिमा भोजने जेष्ठ साहित्यिक, प्रमोद सूर्यवंशी लेखक , कलाकार, तसेच जेष्ठ कलाकार श्री सुधीर पेंडसे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी दीप प्रज्वलन आणि देवीच्या पूजनाने अमरावती मधील राजकमल चौकातिल जोशी हॉल येथे कार्यक्रम संपन्न झाला. त्याप्रसंगी कलाकार कसा असावा, प्रेक्षकांची साद कशी त्यावर कलाकाराची कला सिद्ध होते, कला आत्मसात करण्याचे तंत्र स्वतःच विकसित केले की त्यात री टेक येत नाही असे विचार विजयकूमार खंडारे यांनी व्यक्त केले. त्याचप्रमाणे अन्य अतिथि यानी देखिल आपले विचार मांडले. प्रीति साहू यानी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाजाला आपन काय कसे देतो यावरून आपली योग्यता आपल्याला समजते, आपण समाजाचे देने लागतो, याप्रसंगी गाववाला डॉट कॉम या अप्लीकेशन चे विमोचन केल्याने सर्व सामान्य व्यवसाय धारकाला या स्पर्धेच्या युगात नक्की याचा फायदा होईल त्यातुन आर्थिक उत्पन्न वाढेल, येथिल व्यवसाय येथेच वाढेल त्यातून रोजगार उपलब्ध होईल असे विचार त्यांनी मांडले. भारताची कुटुंब व्यवस्था जगात वाखनन्या सारखी आहे, परंतु भरतात मात्र कुटुंब संस्था व विवाह व्यवस्था कोलमडत असल्याने युवा पीढ़ी देखिल विकृत दिशेला जान्याचे प्रमाण वाढत असुन सरकार याकड़े प्रमाणिक स्वरूपत लक्ष देत नसल्याची खंत एड संतोष शिंदे यानी व्यक्त केली. कार्यक्रमाची प्रस्तावना कलानगरी वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष श्री सागर भोगे यांनी केली, सूत्रांचालन श्री संतोष हांडे यांनी केले. उपाध्यक्ष आशीष सुंदरकर, अमोल कोषकार, भूषण जोंधले, विशाल वानखडे , अनिल मेश्राम आदिनी कार्यक्रमाचे छान पद्धतिने आयोजन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर भोगे यांनी केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



## काँग्रेस व वंचित उमेदवारांच्या प्राचारार्थ सभेत

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी :** लातुर शहरातील प्रभाग १६, १३ आणि प्रभाग १४ मधील काँगेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ शनीवार दि. १० जानेवारी रोजी सायंकाळी लातूरच्या बोधे नगर, वाले इंग्लिश स्कुल आणि वैभव नगर गणेश मंदिर जवळ गणेश चौक या ठिकाणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंत पवार व जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रचार सभा पार पडल्या.

लातुर शहर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६ अनुषंगाने राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारानी शहरातल्या सर्व १८ प्रभागात प्रचारात आघाडी घेतली असून त्यांच्या प्रचार सभाना देखील प्रभागातील मतदार बंधू भगिनीचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. शनिवारी सर्वप्रथम प्रभाग क्र. १६ बोधे नगर मधील झालेल्या सभेत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार उमेदवार जोंधळे काशिनाथ,अभंगे सरोजा, नावंदर रेखा,माडजे अकबर यांनी तर यानंतर पार पडलेल्या प्रभाग १३ मधील वाले इंग्लिश स्कुल जवळील सभेत लांडगे अमोल,मणियार शाहीन, सोमवंशी कमल,देशमुख बालासाहेब आणि शेवटी प्रभाग १४ वैभव नगर गणेश मंदिर जवळ गणेश चौक या ठिकाणी पार पडलेल्या सभेत शिंदे रेणुका,नरटे संतोष,हविले दिपाली,देशमुख गणेश या सर्व काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारानी सभेला उपस्थित प्रभागातील मतदारांना आपला परिचय करून देत आपले मनोगत व्यक्त केले व संवाद साधून मतदारांनी आपल्याला मतरुपी आशीर्वाद द्यावा अशी विनंती देखील केली.

यावेळी बोलताना काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंत पवार म्हणाले की, मागील दोन दिवसापासून मी आपल्या लातुर शहरात आहे.काँग्रेस च्या हाताच्या पंजाला मत मागण्यांसाठी राज्यात जावे लागत आहे असे असताना आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या नावाने ओळखले जाणाऱ्या आपल्या लातुर मध्ये मी आलो यांसाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो.पण भाजपचे अध्यक्ष येथे येऊन आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख पुसण्याची भाषा करतात आपण सारे आदरणीय साहेबांच्या सुसंकृतपणात आपण वाढलो असल्याने आपण संयम बाळगला हे या भाजपने लक्षात ठेवावे.

ज्या रवींद्र चव्हाणने आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या बद्दल आठवणी पुसण्याचे चुकीचे वक्तव्य केले हा निव्वळ एक भांडुप मधला भाजपचा दलाल असून रवींद्र चव्हाण सह देवेंद्र फडणवीस, अभिमन्यू पवार,संभाजी पाटील निलंगेकर, रमेश अप्पा कराड यानि एका व्यासपीठावर यावं मी येतो आणि आपण सर्वानी आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या आठवनि पुसून दाखवाव्यात असे जाहीर आव्हान देत प्रवक्ते हनुमंत पवार यांनी लातुर पासून नागपूर पर्यंत आणि नागपूर पासून मुंबई पर्यंत व पुढे दिल्ली पर्यंत आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनी



केलेल्या कामाचा पाढा वाचला आणि दहावी पर्यंत शिकलेल्या व अन्य भाजपमधील नेत्यांना यावेळी एका व्यासपीठावर चर्चेला येण्याचे जाहीर आव्हान दिले. कोविड काळात गावावगात, शहरातील प्रत्येक भागात वाडी तांड्यावर आपले जीव धोक्यात घालून बालवाडी,अंगणवाडी ताई अशा कार्यकर्ती ताईंनी लस देण्याचे काम केले आणि हा दहावी शिकलेला भाजपचा अध्यक्ष भांडुपचा दलाल रवींद्र चव्हाण म्हणतो आमच्या मोदींनी देशातील नागरिकांना लस देऊन त्यांचे जीव वाचवले अशी जाहिराती बाजी हे भाजपचे लोक करून मत मागतात पण त्या काळात राज्यात महाविकास आघाडिचे आमचे सरकार होते ज्याने उत्तम परिस्थिती हाताळली म्हणून जागतिक स्तरावर आमच्या सरकारचे कौतुक झाले पण आम्ही यांच्या सारखे इतके भिकार नाही कारण राज्यातील जनतेला मृत्यूच्या छायेतून बाहेर काढने हे त्यावेळी आमचे आमच्या सरकारचे प्रथम कर्तव्य होते असे ते म्हणाले.

पुढे बोलताना काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार म्हणाले की,भाजपचे देवेंद्र फडणवीस यांनी बारामती मध्ये अजित पवार यांचा सिंचन घोटाळा, नांदेड मध्ये अशोक चव्हाण यांचा घरकुल घोटाळा, नवाब मलिक यांचा घोटाळा त्यांच्या मतदार संघात काढून जेलमध्ये पाठवण्याची भाषा करतात आनी याच स्वतः भ्रष्टाचाराचे आरोप केलेल्या ना सरकार मध्ये मंत्री पदे देतात हा यांचा आणि यांच्या वाचाळवीरांच्या कथणी आणि करनी मधील फरक आपण सर्व जण उडघ्या डोळ्याने पाहत आहोत या सारकारचा भ्रष्ट प्रशासक कारभार आपण गेली कांही वर्ष पाहतोय आहे,शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर आहे, आरोग्य सेवा वेळेत मिळत नाही,स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा होत नाही याबाबत जाब विचारला तर सर्वसामान्य जनतेला त्यांची मुजोरी पाहायला मिळते ही परिस्थिती लातुर सह सबंध राज्यात पाहायला मिळते आहे तरिही सरकारला याकडे लक्ष द्यायला वेळ नाही त्यांचे लक्ष एकमेकांचे पाय ओढणे,एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे, पक्ष फोडणे,घर फोडणे,सत्ता आणि खुर्ची वाट्टेल ते करणे यातच आधीक लक्ष असल्याचे दिसून येत आहे याचा विचार आपण करावा आणि लातुर महानगर पालिका निवडणूक निमित्ताने आपल्या सर्वांना ही वाईट परिस्थिती बदलण्याची संधी मिळाली असून आपण सर्व मतदारांनी या संधीचे सोने करावे आणि आपल्या काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराणा प्रचंड मतांनी विजयी करून आपल्या प्रभागाचा आणि लातूर शहराचा विकास करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेबांची ओळख पुसण्याची भाषा करणाऱ्या भाजपला दाखवून द्यावे की,आदरणीय विलासराव देशमुख साहेब लातूरचे आणि आमचे लातुर आदरणीय विलासराव देशमुख साहेबांचे होते,आहे आणि यापुढेही राहील त्यांची ओळख कोणीही मिटवू शकणार नाही असे सांगत काँगेस व वंचित बहुजन आघाडीच्या शहरातील सर्व उमेदवाराणा मतरुपी आशीर्वाद इतके द्यावेत की भाजपच्या प्रत्येक उमेदवाराचे निवडणूक डीपॉजिट जप्त झाले पाहिजे अशी विनंती त्यांनी सर्वाना केली.

यावेळी प्रा.गादेकर सर,मौला सौदागर,रविंद्र काळे,अमोल लांडगे,रामदास पवार यांच्यासह लातूर शहर महानगर पालीका निवडणूकीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे सर्व उमेदवार तसेच पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार बंधू भगिनी,परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चांगला उमेदवार

चांगला उमेदवार<br>असेल तर,<br>राजकारणाला<br>चांगला परिणाम<br>देतो...!<br>चांगल्या राजकारणाने<br>चांगला समाज<br>निर्माण होतो...!<br>अन् चांगल्या<br>समाजाने चांगली<br>पिढी निर्माण होते...<br>अन् चांगल्या पिढीने<br>चांगले राष्ट्र<br>निर्माण होते...<br>चांगल्या राष्ट्राने<br>जनतेची उन्नती होते,<br>अन् हे सारे<br>आपल्या...<br>एका मतामुळे<br>घडू शकते...!

**संजय जमदाडे,लातूर**
९८५०० ३७२४३

## नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी भाजपा बांधील : आ. निलंगेकर

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्ष सामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी बांधील आहे. त्यासाठी पक्षाचे हात बळकट करणे आवश्यक असून लातूरकर नागरिकांनी पुढाकार घेवून मनपात भाजपाची सत्ता आणण्यासाठी बहुमत मिळवून द्यावे, असे आवाहन निवडणुक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले. शहरातील प्रभाग १७ व १८ मध्ये आयोजित जाहीर सभेत आ. निलंगेकर बोलत होते. प्रभाग १७ मधील सभेस आ.अभिमन्यू पवार, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, किरण उटगे, अरविंद पाटील निलंगेकर, निलंग्याचे नगराध्यक्ष संजय हलगरकर, उमेदवार अनंत गायकवाड, संगीता




मिरचे व शोभा पाटील तर प्रभाग १८ मध्ये माजी खा. सुधाकर श्रृंगारे, माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, बाबासाहेब कोरे, डॉ. मन्मथप्पा भातांब्रे, सुभाष सुलगुडले, संजय गीर, जाफर पटेल, बालाजी शेळके यांच्यासह उमेदवार ऋषिकेश राजे, सत्यवती चेवले व आदिती पाटील कव्हेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, येणाजया १५ तारखेला आपणास शहराच्या उज्वल भवितव्यावर शिक्कामोर्तब करायचे आहे. येणाजया १५ तारखेला लातूर शहराच्या भविष्याची दिशा ठरणार आहे. आपण ही दिशा ठरविणार आहात. त्यामुळे मतदारांनी कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून भारतीयजनता पार्टीच्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन आ. निलंगेकर यांनी केले आहे.

आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरच्या विकासाचा रोडमॅप तयार केला आहे. न मागता लातूर – मुंबई महामार्ग मंजूर केला आहे. लातूरच्या विकासासाठी त्याचा मोठा फायदा होणार आहे. डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य सरकारचे लातूरवर विशेष लक्ष आहे. लातूर हे मराठवाड्यात सर्वाधिक वेगाने विकसित होणारे शहर आहे. मराठवाड्यातील पहिल्या क्रमांकाचे शहर म्हणून लातूरची ओळख निर्माण करण्यासाठी आपण भाजपाला पाठबळ द्यावे, असेही त्या म्हणाल्या.

## लातूर महानगरपालिकेत भाकरी फिरवा – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील



**लातूर/प्रतिनिधी :** शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत आपण भाकरी फिरवून सत्तांतर घडून आणा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी लातूर येथे केले.

लातूर येथील प्रभाग क्रमांक सात व प्रभाग क्रमांक दहा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, विनोद खटके, सह विविध मान्यवर व दोन्ही प्रभागातील उमेदवार उपस्थित होते.

यापुढे बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की आपण लातूर महापालिकेत काँग्रेस आणि भाजप या दोन्ही पक्षांना सत्ता देऊन बघितला आहात ,त्यांनी मूलभूत प्रश्न सुद्धा त्यांना सोडवता आले नाही हे त्यांचे अपयश आहे परंतु आपण जर आम्हाला सत्ता दिला तर आपण लातूरचे मूलभूत प्रश्न तर सोडूवू तसेच लातूरच्या विकासाची भूक भागवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न आम्ही करणार असल्याचे सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले.

### भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात

## समसापूरच्या सरपंच बरीदे, पोहरेगाव तांडा येथील माजी उपसरपंच राठोड यांच्यासह अनेकांचा भाजपात जाहीर प्रवेश

**लातूर/प्रतिनिधी:** आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील होणाऱ्या विविध विकास कामांना प्रेरीत होऊन समसापूर ता. रेणापूर येथील सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे आणि पोहरेगाव व पोहरेगाव तांडा ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड यांच्यासह अनेकांनी भाजपा नेते आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर येथील संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, नाथसिंह देशमुख, विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, अनिल भिसे, ॲड. दशरथ सरवदे, भाजपा तालुकाध्यक्ष शरद दरेकर, रामराव मोरे, संतोष चव्हाण, विजय गंभिरे, ॲड. रमेश खाडप, श्रीमंत नागरगोजे, अशोक राठोड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या पक्ष प्रवेशामूळे पोहरेगाव जिल्हा परिषद गटात काँग्रेसला खिंडार पडले असून भाजपाची ताकद वाढली आहे.




समसापूर येथील काँग्रेसच्या सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे, उपसरपंच लिंबराज चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या रेखा चौधरी, छाया कलमे, सुरेखा काळे, बालाजी उपाडे यांनी आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. त्यांच्यासमवेत समसापूर येथील महादेव बरीदे, मदन चौधरी, बालाजी काळे, परमेश्वर फुलसे, शैलेश बरीदे, मनोज दत्त, बाबासाहेब इंगावले तर सुमठाणा येथील प्रविण साखरे, बिटरगाव येथील भागवत पाटील यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

पोहरेगाव तांडा येथील माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड, माजी ग्रामपंचायत सदस्य व्यंकट पवार यांच्यासह अशोक राठोड, सर्जेराव राठोड, भागवत आडे, कविता आडे, पांडुरंग जाधव, बालासाहेब राठोड, दत्ता राठोड, कृष्णा राठोड, संतराम पवार, शिवाजी चव्हाण, रामराव राठोड तसेच कोळगाव येथील सतिश राठोड, राहुल राठोड यांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात शासनाच्या विविध योजनेच्या माध्यमातून गाव, वाडी, वस्ती व तांड्यात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून विकास कामांना गती दिली आहे. विकास निधी काय असतो विकास कामे काय असतात हे ग्रामीण जनतेला उमजले आहे. होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन मतदार संघातील अनेक जण भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांना पक्षात सन्मानाची वागणूक दिली जाईल असे याप्रसंगी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले. यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून भाजपात येणाऱ्या सर्वांना योग्य सन्मान दिला जाईल असे बोलून दाखवले. येणारा काळ भाजपाचा असून कार्यकर्त्यांनी जिद्दीने कामाला लागावे.

### १५ जानेवारी सूट्टी नाही.. तर मतदानाचा दिवास..

### जाहीर ..

जाहीरनामा जाहीर<br>उरकले एकदा काम<br>आश्वासने देतानाचं<br>इतका फोडला घाम

कोण करे शब्द पूर्ती<br>शब्द वाचाळ बेफाम<br>कशाला करावे काम<br>भाषणात फक्त ठाम

मागा झुणका भाकर<br>देणारं आक्रोडबदाम<br>करणारं कोण विचार<br>तिजोरीत नसे छदाम

फुकटचे धान्य गरिबां<br>रिकामे कोठारगोदाम<br>तेलाचे टॅंकर्स कोरडे<br>म्हणे कमीकरतो दाम

हवाई रस्ते मनमोहक<br>सोडवतो ट्रॅफिकजॅम<br>खिचडी घोटाळे टाळू<br>देणार ब्रेड बटर जाम

कळस निर्लज्ज पणा<br>नंग्यांनी तुडुंब हमाम<br>आश्वासनातचं डुंबले<br>कसे सारे पक्ष तमाम

धर्म तर हवाच हवा रे<br>आठवला सर्वांना राम<br>जाहीरनामे रद्दीत पडे<br>मग करा फक्त आराम

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## राज्यात थंडीला ब्रेक?

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यात कडाक्याच्या थंडीने नागरिक हैराण झाले असतानाच आता दिलासादायक बातमी समोर येत आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी मोठा अंदाज वर्तविला असून, तापमानात बदल होण्याची शक्यता आहे. राज्यात थंडीचा प्रभाव कायम, मात्र दिलासा मिळणार?

महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात सध्या हिवाळ्याचा प्रभाव जाणवत आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे गेल्या काही दिवसांत राज्यातील अनेक शहरांमध्ये किमान तापमान लक्षणीयरीत्या घसरले होते.

मात्र हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील २४ तासांत किमान तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही. त्यानंतर पुढील चार दिवसांत तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता असून, त्यामुळे थंडीचा कडाका काहीसा कमी होऊ शकतो.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**अभियांत्रिकी कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), कार्यालय मध्य रेल्वे सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी ई-निविदा मागवीत आहेत: ०१. **कामाचे नाव: उस्मानाबाद गुड्स शेडमधील विकास काम.** ०२. **अंदाजे खर्च:** १४,०४,५६,३७५.२१, ०३ **बयाणा रक्कम:** ८,५२,३००.००, ०४. **पूर्ण कालावधी:** १२ महिने, ०५. **देखभाल कालावधी:** २४ महिने, ०६. **ई-निविदा फॉर्मची किंमत:** नाही, ०७ . **वेबसाइट ई-निविदा फॉर्म सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** ०६/०२/२०२६ दुपारी १५:०० वाजेपर्यंत. ०८. **वेबसाइट ई-निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०६/०२/२०२६ रोजी १५:३० वाजेनंतर. ०९. **वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in** टीप: संभाव्य निविदाधारकांना निविदा अंतिम तारखेपूर्वी या वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून **www.ieps.gov.in** या निविदा वेबसाइटवर जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. ANJ-11

तिकिटांसाठी UTS APP डाउनलोड करा



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**व्यावसायिक काम**

**अधिसूचना क्रमांक: GEM/2025/B/6919710**
**दिनांक–** ०९.०१.२०२६, डीआरएम(सी) कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर, लातूर आणि पंढरपूर येथील गुड्स शेडसाठी हाऊसकीपिंग स्वच्छता कंत्राटाकरिता दोन पाकीट प्रणालीद्वारे खुली ई-निविदा आमंत्रित करत आहे. **अ. कामाचे नाव: सोलापूर विभागाच्या सोलापूर (SUR), लातूर (LUR) आणि पंढरपूर (PVR) येथील गुड्स शेडमध्ये २ वर्षांच्या कालावधीसाठी क्रियाकलाप आधारित हाऊसकीपिंग आणि स्वच्छता कंत्राटासाठी निविदा.** ब. कराराचा कालावधी: **२ वर्षे** क. अंदाजित बोली मूल्य: ₹ **१,०५,४७,४४३.५९** ड. अनामत रक्कम: ₹२,०२,७४० ई. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: **३०.०१.२०२६ रोजी १७:००** वाजता. फ. **निविदा दस्तऐवजाचा तपशील: निविदा दस्तऐवज आणि संपूर्ण तपशील GeM पोर्टलवर उपलब्ध आहे. कोणत्याही प्रश्नासाठी, संपर्क साधा:** वरिष्ठ डीसीएम कार्यालय, डीआरएम कार्यालय, सोलापूर. संपर्क क्रमांक: ०२१७-७२३१२२०७, ६३८६४२७८७३, ई-मेल: srdcmrailnet.gov.in. ANJ-12

तिकिटांसाठी UTS APP डाउनलोड करा



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने त्यांच्यासाठी, प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/31** कामाचे नावः – कुरुडवाडी-लातूर रोड विभागातील १) ५०९/२-३ धोकी-औसा रोड दरम्यान, २) ५१७/७-८ औसा रोड-हरंगुळ दरम्यान, ३) ५५१/७-८ लातूर-लातूर रोड दरम्यान, ४) ५५२/१-२ लातूर-लातूर रोड दरम्यान, ५) ५२२/२-३ हरंगुळ-लातूर दरम्यान आणि कुरुडवाडी-मिरज विभागातील ६) ४१६/४-५ मोडलिंब-पंढरपूर दरम्यान, ७) ४४१/४-५ पंढरपूर-सांगोला दरम्यान पादचारी भुयारी मार्ग उपलब्ध करून देण्याशी संबंधित कामाचा विद्युत टीआरडी भाग. **अंदाजित किंमत:** रू ९२,८३,७२५.०८, **बोली सुरक्षा** रू १,८५,७००/-, **कामाचा कालावधी:** १२ महिने, **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस, **वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:** ०५/०२/२०२६ रोजी १५.०० वाजता ANJ-07

तिकिटांसाठी UTS APP डाउनलोड करा



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, सामान्य, मध्य रेल्वे, सोलापूर, हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने त्यांच्यासाठी, प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्र. SUR/L/T/2025/25. कामाचे नाव:** सोलापूर विभागाच्या ADEN/W/SUR आणि ADEN/LUR अंतर्गत SUR (टाईप-III ०४ युनिट्स आणि टाईप-IV ०२ युनिट्स), PJR (टाईप-II ०४ युनिट्स) आणि YSI (टाईप-II ०२ युनिट्स) येथील जुन्या निवासस्थानांऐवजी नवीन निवासस्थानांच्या बांधकामाशी संबंधित विद्युत सामान्य सेवेचे काम. - **अंदाजित किंमत:** २७३८४९२.२६/-, **बोली सुरक्षा:** ५४८००/-, **पूर्णत्वाचा कालावधी:** १२ **महिने, प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस, **निविदा क्र. SUR/L/T/2025/27. कामाचे नाव:** ADEN/KWV (BG) उपविभागांतर्गत KWV (टाईप-III ०४ युनिट्स), MLM (टाईप-II ०४ युनिट्स) येथील जुन्या निवासस्थानांऐवजी नवीन निवासस्थानांच्या बांधकामातील विद्युत सामान्य सेवेचे काम, **अंदाजित किंमत:** १७०५२५४.३५/-, **बोली सुरक्षा:** ३४८००/- **पूर्णत्वाचा कालावधी:** १२ महिने, प्रस्तावाची वैधता: ६० दिवस, **निविदा क्र. SUR/L/T/2025/28. कामाचे नाव:** सोलापूर विभागाच्या ADEN/LUR अंतर्गत LUR (टाईप-III ०४), OSA (टाईप-II ०४ युनिट्स), DKY (टाईप-II ०२ युनिट्स) येथे नवीन निवासस्थानांच्या बांधकामाशी संबंधित विद्युत सामान्य सेवेचे काम, **अंदाजित किंमत:** १९०३१४२.२०/- **बोली सुरक्षा:** ३८१००/- **पूर्णत्वाचा कालावधी:** १२ महिने, **प्रस्तावाची वैधता:** ६० दिवस. ANJ-09

तिकिटांसाठी UTS APP डाउनलोड करा



टोनर रिफिलिंग



फक्त ₹ ३००/-
मास्टरप्रिंट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६